आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३०वाजता

१९ ऑगस्ट २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- केंद्रीय अर्थमंत्र्यांची सार्वजनिक आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांबरोबर आढावा बैठक

- कोलकाता बलात्कार आणि हत्या प्रकरणाची सर्वोच्च न्यायालयाकडून दखल / सरन्यायाधीशांच्या नेतृत्वाखालील खंडपीठासमोर उद्या सुनावणी

- याप्रकरणी प्रधानमंत्र्यांनी स्वतः लक्ष घालावं अशी ७० हून अधिक पद्म पुरस्कारप्राप्त डॉक्टरांची विनंती

- देशभरात रक्षाबंधनाचा उत्साह

**आणि**

- माजी लष्कर प्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचं निधन

**<><><><><>**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांच्या कामकाजाचा आज आढावा घेत आहेत. नवी दिल्ली इथं होत असलेल्या आढावा बैठकीत बँकांच्या ठेवी, कर्ज-ठेवी गुणोत्तर आणि मालमत्तेच्या गुणवत्तेत झालेली वाढ यांचं  मूल्यमापन करण्यात येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना, पीएम सूर्य घर आणि प्रधानमंत्री विश्व कर्मा योजनांचाही या बैठकीत आढावा घेतला जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. नवीन सरकारच्या कार्यकाळातली सीतारामन यांची बँकांबरोबरची ही पहिलीच आढावा बैठक आहे.

**<><><><><>**

१९ वी सीआयआय भारत अफ्रिका व्यापार परिषद उद्या नवी दिल्लीत होत असून या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी झिम्बावेचे उपाध्यक्ष कॉन्ट्याटिनो गुवेया यांचे आज नवी दिल्लीत आगमन झालं. त्याच्या उपस्थितीमुळे भारत आणि

झिम्बावे याच्यातील परस्पर संबंध अधिक दृढ होतील, असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी आपल्या समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. याद्वारे भारत आणि अफ्रिकेतील परस्पर सहकार्याची भावना अधिक मजबूत होईल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

कोलकात्यातल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणाची दखल सर्वोच्च न्यायालयाने घेतली असून उद्या त्यावर सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यीय पीठासमोर सुनावणी होणार असून, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा हे या पीठाचे सदस्य आहेत. पीडित डॉक्टरचे पालक आणि काही व्यक्तींनी दाखल केलेल्या याचिकांची दखल घेत या प्रकरणाची सीबीआय मार्फत चौकशी करण्याचे आदेश कोलकाता उच्च न्यायालयानं १३ ऑगस्टला दिले होते. त्यानंतर आर जी कार वैद्यकीय महाविद्यालयात आंदोलन सुरू असताना तिथे झालेल्या तोडफोडी बद्दल न्यायालयानं नुकतंच पश्चिम बंगाल प्रशासनालाही या प्रकरणी जाब विचारला आहे.

पश्चिम बंगालचे राज्यपाल सी. व्ही. आनंद बोस यांनी राज्यातल्या सर्व वैद्यकीय महाविद्यालयं आणि रुग्णालयांना आपल्या परिसरातली सुरक्षा वाढवण्याचे निर्देश दिले आहेत. महिला डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांना संरक्षण देण्याचे निर्देशही राज्यपालांनी राज्यभरातल्या रुग्णालय प्रशासनाला दिले आहेत.

कोलकात्यातल्या महिला डॉक्टर बलात्कार आणि हत्या प्रकरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वतः लक्ष घालावं, अशी विनंती करणारं पत्र देशातल्या ७० हून अधिक पद्म पुरस्कारप्राप्त डॉक्टरांनी लिहलं आहे. अशा हिंसक कृती वैद्यकीय व्यवसायाचा पाया हादरवणाऱ्या असून महिला आणि आरोग्य कर्मचाऱ्यांच्यांविरोधात होणाऱ्या हिंसाचाराकडे तातडीनं लक्ष पुरवण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे.

पुन्हा पुन्हा घडणाऱ्या अशा घटनांना पायबंद घालण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी डॉक्टरांनी या पत्राद्वारे केली.

कोलकाता प्रकरणाच्या निषेधार्थ राजधानी दिल्लीत निवासी डॉक्टर्स आणि वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचं आंदोलन कालही सुरू होतं. निवासी डॉक्टरांच्या संघटनेच्या वतीनं काल संध्याकाळी दिल्लीतील राजीव चौक मेट्रो स्थानकानजीकच्या परिसरात मेणबत्ती मोर्चा काढण्यात आला. या दुःखद घटनेबद्दल जागरुकता निर्माण करण्याच्या उद्देशानं मानवी साखळी तयार करून मेणबत्त्या प्रज्वलित करण्यात आल्या. याप्रकरणी न्याय मिळावा अशी मागणी त्यांच्यावतीनं करण्यात आली.

**<><><><><>**

माजी राष्ट्रपती दिवंगत शंकर दयाळ शर्मा यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात त्यांना आदरांजली वाहिली. राष्ट्रपती भवनातल्या अधिकाऱ्यांनीही शंकर दयाळ शर्मा यांच्या राष्ट्रपती भवनातल्या प्रतिमेला फुलं  वाहून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

**<><><><><>**

भारतीय नौदलाची INS तबर ही प्रमुख युद्धनौका दोन दिवसांच्या भेटीसाठी डेन्मार्कच्या एस्जबर्ग येथे दाखल झाली आहे. भारत आणि डेन्मार्क यांच्या नौदलांदरम्यान असलेले संबंध अधिक वृद्धिंगत करणं हा आयएनएस तबरच्या या भेटीचा उद्देश असल्याचं संरक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे. INS तबर बंदरात असताना या नौकेवरील कर्मचारी डेन्मार्कच्या सैन्य दलासोबत आयोजित करण्यात आलेल्या विविध द्विपक्षीय व्यावसायिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहे, यामध्ये सांस्कृतिक कार्यक्रमांचाही समावेश आहे.

**<><><><><>**

माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल.मुरुगन आज चेन्नई मध्ये मंत्रालयाच्या विविध विभागांचा आढावा घेणार आहेत. या वेळी तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणाचे प्रादेशिक प्रमुखांच्या उपस्थितीत त्यांच्याकडून पत्र सूचना कार्यालय, केंद्रीय संचार ब्युरो, सेन्सॉर बोर्ड, आकाशवाणी आणि दूरदर्शन च्या स्थानिक कार्यालयांमध्ये डॉ. मुरुगन भेट देत आहेत.

**<><><><><>**

बहीण भावांच्या नात्याचे बंध अधिक घटट् करणारा रक्षाबंधन हा सण आज देशभर मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. आज सकाळपासूनच बहिणींनी आपल्या भावांना राखी बांधून त्यांच्या दीर्घायुष्याची कामना केली. महाराष्ट्रात आज  नारळी पौर्णिमा साजरी होत आहे. कोळी बांधवांसाठी आपल्या मासेमारीचा नवा हंगाम सुरु करण्याचा हा दिवस. या दिवशी समुद्राला नारळ अर्पण करुन आपल्या होड्या समुद्रात लोटण्याची प्रथा आहे. या निमित्ताने महाराष्ट्रात किनापट्टीवरच्या  कोळी वसाहतींमधे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. रक्षाबंधनानिमित्त देशभरातल्या बाजारपेठा रंगीबेरंगी राख्या, मिठाया आणि भेटवस्तूंनी सजल्या आहेत. रक्षाबंधनानिमित्त राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आज शालेय विद्यार्थ्यांनी राख्या बांधल्या. परंपरेनुसार आज संध्याकाळी अमरनाथ यात्रा समाप्त होत आहे. यंदा विक्रमी संख्येने भाविकांनी या पवित्र गुंफेचं दर्शन घेतल्याचं अमरनाथ देवस्थाननं सांगितलं.

**<><><><><>**

प्रो गोविंदा लीग स्पर्धेच्या माध्यमातून दहीहंडीचा खेळ जगभरात पोहोचतो आहे, याचा आनंद असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ
शिंदे यांनी काल केलं. या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात ते वरळी इथं बोलत होते. खेळात स्पर्धा असावी, पण ती जीवघेणी असता कामा नये, असं सांगून

अपघातमुक्त दहीहंडी साजरी करण्याचं आवाहन त्यांनी केलं. या खेळाला १०० वर्षांची परंपरा आहे, स्वातंत्र्यपूर्व काळापासून हा खेळ खेळला जातो आणि आता याचा समावेश साहसी खेळांमध्ये करण्यात आला आहे, असंही शिंदे यांनी नमूद केलं. प्रो गोविंदा लीग स्पर्धेत यंदा ३२ संघांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी १६ संघांनी कालच्या कार्यक्रमात आपलं कौशल्य दाखवलं. ‘सातारा सिंघम’ या संघानं पहिलं बक्षीस पटकावलं.

**<><><><><>**

देशातला पहिला एआय अर्थात कृत्रिम बुद्धीमत्ता कुंभमेळा नाशिकमध्ये होणार आहे. या अनुषंगानं काल नाशिकमध्ये तंत्रज्ञान आणि परंपरेचा संगम साधणाऱ्या, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पहिल्या बिल्डथॉनचं, उद्घाटन विभागीय आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांच्या हस्ते झालं. यावेळी राज्य शासनाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी निधी चौधरी यांनी अत्याधुनिक कृत्रिम बुद्धीमत्ता साधनांवर आधारित सादरीकरण केलं. कुंभथॉनच्या अधिकृत संकेतस्थळाचं तसंच कुंभ मेळ्यासाठी समर्पित एआय - सक्षम चॅटबॉटचं उद्घाटनही करण्यात आलं.

**<><><><><>**

इस्त्रायल आणि हमास दरम्यानचा संघर्ष संपुष्टात आणण्याच्या अनुषंगानं या आठवड्यात गाझामध्ये युद्धविराम होण्याकरिता राजनैतिक दबाव वाढावा, या उद्देशानं अमेरिकेचे परराष्ट्र सचिव अँटनी ब्लिंकन पश्चिम आशियाच्या दौऱ्यावर आहेत. आज ते इस्त्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांच्यासह इतर इस्त्रायली नेत्याची भेट घेणार आहेत, असं अमेरिकी प्रशासनाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यानं सांगितलं. गेल्या ऑक्टोबरमध्ये इस्त्रायल- हमास संघर्ष सुरू झाल्यापासून ब्लिंकन या भागाला १० व्यांदा भेट देत आहेत. इस्त्रायलनंतर ते इजिप्तला भेट देणार आहेत. दरम्यान काल रविवारी गाझावर झालेल्या हवाई हल्ल्यात सहा मुलांसह २१ जण ठार झाल्याचं पॅलेस्टाईनच्या आरोग्यसेवेतील सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

माजी लष्कर प्रमुख जनरल सुंदरराजन पद्मनाभन यांचं आज चेन्नईत निधन झालं.ते ८३ वर्षांचे होते. देहरादूनचं राष्ट्रीय भारतीय लष्करी महाविद्यालय आणि पुण्याजवळ खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीत त्यांचं शिक्षण झालं होतं. त्यांनी अनेक महत्वपूर्ण आघाड्यांवर सैन्याचं नेतृत्व केलं होतं तसंच अनेक युद्धांमध्ये कामगिरी केली होती. पद्मनाभन यांनी काही पुस्तकांचही लिखाण केलं होतं.

//<><><><><>//